# फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनचे गतीमंदांसाठी शिबिर

● मुंबई । प्रतिनिधी

साता-यामधील गतिमंद मुलांसाठी मदतीचा हात पुढे करण्याचे प्रयत्न कायम राखत, फिनोलेक्स इंडस्ट्रीज व सीएसआर पार्टनर मुकुल माधव फाऊंडेशन (एमएमएफ) आता सातारा तालुका, जिल्हा सातारा येथे फिजियोथेरपी सत्रांची सुविधा प्रदान करत आहेत. सध्या, सातारा मधील जिल्हा परिषदेमध्ये पूर्णत: सुसज्जित सेट-अप आहे. पण, सेवांच्या प्रबळ सुलभतेच्या खात्रीकरिता, फिनोलेक्स इंडस्ट्रीज व एमएमएफने संचेती हॉस्पिटल, पुणे येथील तज्ज्ञ फिजियोथेरेपीस्ट्सना पाचारण करण्याद्वारे पाठिंबा विस्तारित केला आहे.

विद्यमान सेटअपमध्ये भर करण्यात आलेल्या या बदलाचा हेतू प्रदान करण्यात आलेल्या सुविधांमधून लाभ प्राप्त होणा-या मुलांची संख्या वर्धित करण्याचा आहे. या मुलांच्या नियमित काळजीच्या खात्रीकरिता, डॉक्टर्स त्यांच्या सेवा प्रदान करण्याकरिता दर बुधवारी येथे येतील.

या जिल्ह्यामध्ये यशस्वीरित्या दुसरे केंद्र सुरु केल्यामुळे आनंदित झालेले, मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त श्रीमती रितू प्रकाश छाब्रिया म्हणाल्या, ''आम्ही अधिका-यांचे, मुख्यत: मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ. राजेश देशमुख व शिक्षण अधिकारी, श्रीमती पुनिता गुरव यांचे आभार मानतो, ज्यांनी आमच्या उपक्रमाला सातत्याने पाठिंबा दर्शविला आहे. आमच्या उद्घाटनाच्या दिवशी, १९ मुलांनी आमच्या सेवांचा लाभ घेतला. वाईमधील मिराजकर हॉस्पिटल येथील आमचे पहिले केंद्र यशस्वीरित्या सुरू आहे आणि आणि लवकरच, आम्ही पाटण तालुक्यामध्ये आमचे तिसरे केंद्र सुरू करण्याची योजना आखत आहोत. याव्यतिरिक्त, आम्ही वाई केंद्रामध्ये स्पीच थेरपी प्रदान करत आहोत आणि आशा करतो की साता-यामध्ये सुद्धा ही सेवा दाखल करू.''